राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत
कुलसचिव या संवर्गातील एकूण ४ पदे
प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत मागणीपत्र

कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध विकास आणि मत्स्य व्यवसाय विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
५वा मजला, मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण १५१७/प्र.क्र.३७२/६-ए

दिनांक ०४ सप्टेंबर, २०१७

वाचा : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही २०११/प्र.क्र.१३७/कार्यासन-१२, दिनांक १७/१२/२०१६

कृषी व पदुम विभागाच्या अधिपत्याखालील राज्यातील डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर या चारही कृषी विद्यापीठांमधील कुलसचिव हे रिक्त पद प्रतिनियुक्तीने भरावयाचे आहे. यासाठी, खालील तक्त्यात नमूद पात्रता आणि संवर्गानुसार शासकीय अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नांव | पदस्थापनेचे ठिकाण व पदांची संख्या | वेतनश्रेणी | पात्रता | ज्या संवर्गामधून भरावयाचे आहे त्या संवर्गाची नांवे |
|---|---|---|---|---|
| कुलसचिव | डॉ. बासाकोंकृवि, दपोली – १ पद<br><br>डॉ. पंदेकृवि, अकोला – १ पद<br><br>वनामकृवि, परभणी – १ पद<br><br>मफुकृवि, राहुरी – १ पद | रुपये ३७४००-६७००० + ग्रेड पे ८७०० | मूळ संवर्गामध्ये समकक्ष वेतनश्रेणीमध्ये वेतन आहरित करीत असलेल्या राज्य शासनाच्या सेवेतील कोणत्याही अधिकाऱ्यांमधून<br><br>किंवा<br><br>पीबी -३ रुपये १५६००-३९१०० + | मूळ संवर्गामध्ये समकक्ष वेतनश्रेणीमध्ये वेतन आहरित करीत असलेल्या राज्य शासनाच्या सेवेतील कोणत्याही अधिकाऱ्यांमधून<br><br>कृषी आयुक्तालयांतर्गत संचालक /कृषी सह संचालक<br><br>किंवा<br><br>महसूल विभागांतर्गत अतिरिक्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ग्रेड वेतन रुपये ६६०० या वेतनश्रेणीमध्ये वेतन आहरित करीत असलेल्या व वरिष्ठ पदावर पदोन्नतीसाठी आवश्यक असलेली अर्हता व पात्रता धारण केलेल्या अधिकाऱ्यांमधून | जिल्हाधिकारी(निवडश्रेणी)/ अतिरिक्त जिल्हाधिकारी/ उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) |
| नियंत्रक | डॉ. बासाकोकृवि, दपोली – १ पद | रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे रुपये ६६०० | पीबी -३ रुपये १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रुपये ६६०० या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणाऱ्या वा पदोन्नतीसाठी आवश्यक असलेली अर्हता व पात्रता धारण केलेल्या अधिकाऱ्यांमधून | वित्त विभागांतर्गत लेखा व कोषागारे संचालनालयातील उप संचालक/उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) |

२. प्रतिनियुक्तीचा कालावधी प्रथमत: १ वर्षाच्या कालावधीसाठी राहील. त्यानंतर आवश्यकता विचारात घेऊन संबंधित अधिकाऱ्याची इच्छुकता व प्रतिनियुक्तीने सेवा देणाऱ्या संवर्ग नियंत्रण प्राधिकाऱ्यांच्या संमतीने हा कालावधीत जास्तीत जास्त ३ ते ५ वर्षापर्यन्त वाढविता येईल.

३. सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

४. सदर पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र अधिकारी यांनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात (परिशिष्ट-ड) भरुन असे परिपूर्ण अर्ज त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत निम्न स्वाक्षरीतांकडे जाहिरातीच्या दिनांकापासून ३ आठवड्यात पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

५. प्रशासकीय विभागांनी परिपूर्ण स्वरुपातील अर्ज त्यांच्या आवश्यक प्रमाणपत्रांसह व संबंधित अधिकारी यांच्या मागील ५ वर्षांच्या गोपनीय अहवालाच्या सत्यप्रतींसह या विभागाकडे कोणत्याही परिस्थितीत

## प्रशासकीय विभाग व संवर्ग नियंत्रक विभागाने भरावयाचा तपशील

प्रमाणित करण्यात येते कि,

१. श्री/श्रीमती.........................................................पद.........................यांनी सादर केलेला अर्ज तपासला असून त्यांनी अर्जामध्ये दिलेली माहिती सेवाअभिलेखानुसार बरोबर आहे.

२. श्री/श्रीमती .......................................................पद............................. यांची प्रतिनियुक्तीच्या पदासाठी निवड झाल्यास त्यांना प्रतिनियुक्तीच्या पदावर हजर होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात येईल.

३. श्री/श्रीमती .....................................................पद.............................. यांचेविरुध्द मनासे (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार कोणतीही विभागीय चौकशी सुरू नाही अथवा त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार/ लाचलुचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही.

४. श्री/श्रीमती .................................... पद........................यांचेविरुध्द कोणत्याही शिक्षेची अंमलबजावणी सध्या चालू नाही.

५. श्री/श्रीमती....................................................... यांना मागील १० वर्षाच्या कालावधीमध्ये झालेल्या गंभीर अथवा किरकोळ शिक्षेचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| पद | शिक्षेचे स्वरूप | शिक्षा संपुष्टात आल्याचा दिनांक |
|---|---|---|
| | | |
| | | |

६. प्रमाणित करण्यात येते कि, श्री /श्रीमती ........................................ हे कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १०% पेक्षा अधिक पदे रिक्त नाहीत.

७. श्री /श्रीमती .................................... याना प्रतिनियुक्तीने ................या पदावर .............या कार्यालयात नियुक्त करण्यास या विभागाची हरकत नाही.

८. श्री/श्रीमती...........................................यांच्या उपलब्ध असलेल्या मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांच्या सत्यप्रती सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

सही/-

(नाव.......................)

पदनाम.....................

.........................विभाग

दिनांक : ........................................

----------

## परिशिष्ट - ड

## प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्जदारांनी करावयाच्या अर्जाचा नमुना

१. नाव ( संपूर्ण नाव) : ...........................................................

२. ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पद व कार्यालयाचे नाव : ...........................................................

३. (अ) सध्या धारण केलेले पद व पदस्थापनेचे ठिकाण : ...........................................................

(ब) वेतनश्रेणी : ...........................................................

४. सध्या कार्यरत असलेल्या पदाचा संवर्ग नियंत्रक विभाग : ...........................................................

५. जन्मदिनांक : ...........................................................

६. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास असलेले वय (वर्षे व महिने) : ...........................................................

७. शैक्षणिक अर्हता : ...........................................................

८. मागासवर्गीय प्रवर्गात येत असल्यास, प्रवर्ग : ...........................................................

९. सध्या धारण केलेले पद नियमित आहे किंवा तात्पुरते आहे , नियमित असल्यास नियमित दिनांक : ...........................................................

१०. अधिकारी/कर्मचाऱ्यांनी घोषित केलेला स्वग्राम तालुका व जिल्हा : ...........................................................

११. शैक्षणिक अर्हता व अनुभव :

| | |
|---|---|
| शैक्षणिक अर्हता | १.<br>२.<br>३. |
| अनुभव | १.<br>२.<br>३. |

दिनांक २९/०९/२०१७ पर्यन्त पाठवावेत. विहित मुदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास अशा अधिकाऱ्यांचा प्रतिनियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.

(छा.दि. अध्यापक)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन
दूरध्वनी क्रमांक – ०२२-२२०२ ३१

प्रति,

१) सह सचिव/उप सचिव (आस्थापना), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

त्यांना विनंती की, सदरहू मागणीपत्र आपल्या अधिपत्याखालील कार्यालयप्रमुख / विभागप्रमुखांच्या तातडीने निदर्शनास आणण्यात यावे.

२) आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे

त्यांना विनंती की, सदरहू मागणीपत्र आपल्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये तातडीने निदर्शनास आणण्यात यावे.

३) उप सचिव (कार्यासन १२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित –**

१) संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय

यांना विनंती की, प्रस्तुत मागणीपत्र मंत्रालयीन इंट्रानेटवरील संदेश फलकावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

२) कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी,
कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला,
कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर

यांना विनंती की, प्रस्तुत मागणीपत्र आपल्या विद्यापिठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी. विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी करुन आपल्या अभिप्रायासह उक्त अर्ज प्राथम्यक्रम लावून शासनास त्वरित सादर करण्यात यावेत.